Special Issue
Part-02
January 2020

VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

# "साहित्य, समाज आणि संस्कृती"



संपादक
प्रा.डॉ.औदुंबर जाधव

सहसंपादक
प्रा.पवार राजकुमार
प्रा.दत्ता सरगर

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

श्री विद्या विकास मंडल संचलित

**श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगलवेढा**

(मराठी विभाग)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## "साहित्य, समाज आणि संस्कृति"

**खंड २ - साहित्य आणि समाज चिंतन**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Index

01) Exploring Communal Crisis In Mahesh Dattani's Final Solutions
**Dr. Sanjay S. Shivsharan, Mangalwedha** ||18

02) Financial Inclusion In India - A Review
**Prof.Samadhan Vishnu Bhagare, Mangalwedha** ||20

03) संत तुकारामांच्या अभंगातील चिरंतन सामाजिक सत्य
**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे, देगलूर** ||25

04) संत तुकारामांच्या अंभंगातील समाजदर्शन
**लक्ष्मी जाधव, मिरज** ||29

05) बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारा भाकरीची शपथ कथा संग्रह
**डॉ. संजय पाटोळे, रत्नागिरी** ||33

06) दलित कवितेतील समाजदर्शन
**प्रा. प्रेरणा एल. चव्हाण, कोल्हापूर** ||37

07) आदिवासी समाज संस्कृती आणि साहित्य
**प्रा.डॉ. राजेश धनजकर, परभणी** ||39

08) भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती : एक चिंतन
**प्रा.डॉ. डी. आर. गाकयवाड, सोलापूर** ||43

09) संत साहित्याचे सामाजिक संदर्भ
**डॉ. सुवर्णा गुंड–चव्हाण, वडाळा** ||46

10) औरंगाबाद येथील अंजिठा वेरुळ लेण्यांचा एक सांस्कृतिक, भौगोलिक अभ्यास
**डॉ. राजेश भिमराव गावकरे, मंगळवेढा** ||49

11) संत साहित्याचे सामाजिक संदर्भ
**डॉ. नवनाथ दणाणे, बार्शी** ||53

12) २००० नंतरची ग्रमिण कविता : विशेष संदर्भ ऐश्वर्य पाटेकर लिखीत भुंईशास्त्र
**प्रा.श्री. कृष्णा काशिराम कोटकर, वरूडचक्रपान** ||57

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | January 2020 Special Issue-02 

11

# संत साहित्याचे सामाजिक संदर्भ

**डॉ. नवनाथ दणाणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

तेराव्या शकातील चक्रधरांपासून ते सतराव्या शतकातील तुकारामांपर्यंतच्या संत साहित्याचे आकलन केले असता, असे दिसते की संत साहित्यामध्ये तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे व्यापक सामाजिक संदर्भ आलेले आहेत. महानुभाव संप्रदायाबरोबरच वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, कर्ममेळा, एकनाथ व तुकाराम अशा निवडक संताच्या साहित्याचा विचार केला असता, त्यांच्या काळातील सामाजिक संदर्भाचे दर्शन घडते. संत साहित्यामध्ये त्या त्या संताच्या कालखंडातील प्रथा, परंपरा, विचार प्रवाह, वृत्ती, प्रवृत्ती त्याचबरोबर धार्मिकता व जात वास्तवाचे अनेक संदर्भ लक्षात येतात. सर्वसामान्य निरीक्षर समाजाला कोण कोणत्या अडचणींचा व समस्यांचा सामाना करावा लागत होता. याचे अनेक संदर्भ संत साहित्यातून उलगडत जातात. विशेषत: तुकारामांच्या अभंग रचनांमधून व्यापक सामाजिक संदर्भाचा प्रत्यय येतो. त्या संदर्भाचा पुढील प्रमाणे आढावा घेता येईल.

तेराव्या शतकात उदयास आलेल्या महानुभाव संप्रदायाच्या कार्याचा विचार करताना असे दिसते की, महानुभाव संप्रदायाने व्यवस्था परिवर्तनाचा विचार मांडलेला आहे. महानुभाव संप्रदायाचे प्रणेते चक्रधर स्वामी यांनी आपल्या संप्रदायामध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंपरागत चातुर्वर्ण्य व्यवस्थेला त्यांनी विरोध दर्शविला आहे. उत्तम म्हणजे ब्राम्हण: आन अधम म्हणजे मातंग ऐसे म्हणे: परि तोही मनुष्य देही आन निष्पत्तिकारकची असे: परि वृथा कल्पना करीत[१] जातीवरुन ठरविले जाणारे माणसाचे श्रेष्ठ कनिष्ठत्व चक्रधरांनी स्पष्टपणे नाकारले आहे. चातुर्वर्ण्य हे अत्यंत चुकीचे व निरर्थक असल्याचे ते येथे सांगतात. त्यांनी आपल्या आचार कृतीतूनही अनेक वेळा जातिभेदाला मूठमाती देणारा आदर्श घालून दिला आहे. ते मांगा, महाराघरी अरोगणाही करीत असत. मांगा, महाराघरी 'अरोगणा' करणारे चक्रधर जातिव्यवस्थेच्या विरोधात खरोखरच बंडखोरी करताना दिसतात. स्त्री–पुरुष समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्नही ते करताना दिसतात. चक्रधर आपल्या स्त्री शिष्यांना सन्यास घेण्याची अनुमती देतात. त्यांची ही कृतीही अत्यंत क्रांतिकारक ठरते. महानुभाव संप्रदायाने अशा प्रकारे समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु महानुभाव संप्रदायाचा समता विचार तत्कालिन समाजाला रुचला नाही. त्यामुळे तत्कालिन समाजव्यवस्था बदलण्यामध्ये महानुभाव संप्रदायाला फारसे यश आले नाही. चक्रधरानंतर तेराव्या शकातील ज्ञानेश्वरांनीही काही प्रमाणात समतेचा आग्रह धरलेला दिसतो.

म्हणोनि कुळ जाती वर्ण।
हे आवघेचि अकारण।[२]

अशा अगदी सौम्य स्वरुपात ज्ञानेश्वर वर्णव्यवस्था नाकारतात. ज्ञानेश्वर वर्णव्यवस्थेची व्यर्थता सांगतात, परंतु तिच्या विरोधात बंडात्मक पवित्रा घेताना दिसत नाहीत. भाषिकदृष्ट्या मात्र त्यांचे बंड महत्त्वाचे ठरते. ज्ञानेश्वरीच्या रुपाने गीतेच्या अठरा अध्यायातील सातशे संस्कृत श्लोकांचे मराठी भाषांतर करुन त्यांनी एक प्रकारे भाषिक बंडखोरी केली आहे. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी, गीतेतील तत्वज्ञान उपलब्ध करुन दिले असले तरीही, ज्ञानेश्वरांचे बंड केवळ समतेच्या आग्रहापुरते व भाषिक बंडापुरतेच मर्यादित राहिले. गं.बा.सरदार म्हणतात त्याप्रमाणे, ज्ञानेश्वरांनी वैदिक परंपरेला, श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माला प्रमाण मानले होते. श्रुतीला तर ते साक्षात 'माऊली' म्हणतात, कार्याकार्यविवेकी। शास्त्रेंचि करावी पारखी। असे म्हणून ते स्मृतिग्रंथांची थोरवी गातात. चातुर्वर्ण्याच्या व जन्मसिध्द जातिव्यवस्थेच्या चौकटीला त्यांनी धक्का लावला नाही.[३] ज्ञानेश्वर वर्णजातिव्यवस्था नाईलजाने मानीत नसून श्रध्दापूर्वक मानीत होते. हे सांगताना पुढे ते म्हणतात, जातिभेद हा नैसर्गिक व क्रमप्राप्तच आहे. ज्याप्रमाणे स्वत:च्या काळेगोरेपणाबद्दल कोणी तक्रार

करण्यास भाग पाडले जात होते. त्यासाठी शास्त्र, पोथ्या, पुराणांचा धाक दाखविला जात होता. समाजाला कर्मकांडांच्या खाईत लोटण्याचे काम ब्राम्हण भटभिक्षुकांकडून चालू होते. बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे षड्यंत्र रचले गेले होते. अध्ययन, अध्यापनाचा अधिकार हा फक्त ब्राम्हण वर्गाकडेच होता. समाजात दांभिक साधुंचा सुळसुळाट माजला होता. धर्माच्या नावाखाली अज्ञानी जनतेला लुबाडण्याचा प्रयत्न अशा संधीसाधू व ढोंगी साधू, सन्यासांकडून सर्रास चालू होता. समाजामध्ये कर्मठ रुढी, परंपरा, कर्मकांड, अज्ञान, शूद्र देवदेतांचे स्तोम माजले होते. पूजाविधाला मोठ्य प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले होते. सोवळेओवळे विधिनिषेधांच्या कल्पना सर्व सामान्यांच्या मनात रुजल्या गेल्या होत्या. नवस सायासा सारख्या अंधश्रध्दा मोठ्य प्रमाणात जोपासल्या जात होत्या. हे सर्व धर्मवेडातून चालू होते. हे सामाजिक वास्तव तुकारामांनी खूप जवळून अनुभवले होते. धार्मिकतेच्या नावाखाली सामाजामध्ये चाललेला अनाचार, पोषली जाणारी विषमता, अंधश्रध्देच्या आहारी गेलेला समाज, ढोंगी दांभिकतेचे साम्राज्य, अज्ञान व समाजामध्ये राजरोसपणे चाललेला अनैतिक व्यवहार, या सर्व गोष्टींमुळे ते अस्वस्थ झाले होते. संवदेनशील व समाजचिंतक तुकाराम अशा परिस्थितीमध्ये स्वस्थ बसणे शक्य नव्हते. हे सर्व समाजवास्तव उघडया डोळयाने पाहणे त्यांना पसंत नव्हते. हे सर्व बदलले पाहिजे, या आंतरिक उर्मीतून तुकारामांनी समजप्रबोधन कार्याला वाहून घेतले. त्यातूनच मग समाजातील घातक रुढी—परंपरा, अनाचार, दृष्ट वृत्ती, प्रवृत्तीवर ते प्रखर हल्ला चढवितात. तत्कालीन दांभिक व ढोंगी, धर्मभ्रष्ट व्यवस्थेवर ते तुटून पडतात. त्यांनी केलेली धर्मचिकित्सा, जातिवर्णव्यवस्था विषयक भूमिका, त्यांचा परमेश्वर व वेदविषयक दृष्टिकोन, अंधश्रध्दादी कर्मकांडांवर त्यांनी केलेली प्रहार, मानवी दुष्ट वृत्ती, प्रवृत्तीवर त्यांनी चढविलेला हल्ला, ढोंगी दांभिकता, भोंदूगिरी प्रवृत्तीचा त्यांनी घेतलेला समाचार, सर्व सामान्यांसाठी त्यांनी घालून दिलेला आचारधर्म इ. मधून त्यांच्या अभंगामधील सामाजिक संदर्भ पाहायला मिळातात. एकूणच संत साहित्याचा विचार करता, सं साहित्य हे सामाजिक संदर्भांना वाहिलेले दिसते.

## संदर्भ सूची :—

१. भालचंद्र फडके : 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे —३०, तृतीयावृत्ती, २०००, पृ.४५
२. शंकरराव खरात : 'संतांची सामाजिक दृष्टी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे —३०, प्रथमावृत्ती, २००५, पृ.८६
३. गं.बा. सरदार : 'संत वा.मयाची सामाजिक फलश्रुती' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, ३०, चतुर्थावृत्ती, पृ.४६
४. तत्रैव : पृ.१२
५. सतीश बडवे : 'मध्ययुगीन साहित्यातील विद्रोह' (लेख) 'साहित्य आणि विद्रोह', पृ.४६
६. शंकरराव खरात : 'चोखोबाचा विद्रोह', सुगावा प्रकाशन, पुणे—३०, प्रथमावृत्ती, १४ एप्रिल, २००२, पृ.२६
७. तत्रैव : पृ.२६
८. तत्रैव : पृ.२६
९. तत्रैव : 'संतांची सामाजिक दृष्टी', उनि, पृ.१३४
१०. पुरुषोत्तम लाड (संपा) : 'श्री तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा' शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, प्रकाशन, मुंबई द्वितीय आवृत्ती —१९५५ अभंग क्र.५५७
११. तत्रैव : अभंग क्र.५५९
१२. तत्रैव : अभंग क्र. ११४२
१३. तत्रैव : अभंग क्र. ४६
१४. तत्रैव : अभंग क्र. ३३७
१५. तत्रैव : अभंग क्र. ३४६१
१६. तत्रैव : अभंग क्र. ६२१
१७. तत्रैव : अभंग क्र. ९८९
१८. तत्रैव : अभंग क्र. १०२७
१९. तत्रैव : अभंग क्र. २७१४
२०. तत्रैव : अभंग क्र. ४६५
२१. तत्रैव : अभंग क्र. ८६६
२२. तत्रैव : अभंग क्र. ४३१०

□□□

'असाध्य ते साध्य करिता सायास' हा विचार घेऊन स्व. रतनचंदजी शिवलाल शहा व त्यांच्या समविचारी सहकार्यांनी गरीब, मागास, शोषित समाजाला विकासाच्या वाटेवर आणण्याच्या हेतूने सन १९७८ मध्ये श्री विद्या विकास मंडळ संचलित, श्री संत दामाजी महाविद्यालयाची स्थापना केली. सध्या महाविद्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ विभागात कला, वाणिज्य, शास्त्र हे विभाग कार्यरत असून, महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. वरिष्ठ विभागातील मराठी, अर्थशास्त्र, इंग्रजी विषयात सुवर्णपदके मिळाली आहेत. आमच्या महाविद्यालयाचा क्रीडा विभाग अधिक सक्षम असून या विभागातील अनेक खेळाडूंनी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर नेले आहे. याशिवाय सर्वांगीण विकासासाठी अंगणवाडी, बालवाडी, स्पोकन इंग्लिश, टॅली, सुगम संगित कोर्स, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, प्लेसमेंट कॅम्प, लॅंग्वेज लॅब, संगणक कक्ष, इंटरनेट सुविधा, व्हर्चुअल क्लासरूम अशा आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.



Cosmos
IMPACT FACTOR
5.234

Indexed

IMPACT FACTOR 6.021 ijif

*Publisher & Owner*
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

ISSN 2319 9318